# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोल्हापूर शहराचा विस्तार झपाट्याने होत असून हद्दवाढीला विरोध होत असल्याने अनधिकृत बांधकामे बिनधास्तपणे बांधली जात असल्याबाबत

**(१) १०८५ (२३-१२-२०१४). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराचा विस्तार झपाट्याने होत असून हद्दवाढीला विरोध होत असल्याने अनधिकृत बांधकामे बिनधास्तपणे बांधली जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शहरात अपुरा पाणीपुरवठा, ड्रेनेज-गटारे तुंबणे, कच-यांचे ढीग वाहतूकीची कोंडी या सारखे प्रश्न नागरिकांना भेडसावत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी शासनास्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

महानगरपालिका हद्दीमध्ये अशा प्रकारे अनधिकृत बांधकामे होत असलेचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीप्रमाणे वेळीच कार्यवाही केली जात असल्याने असे बांधकाम निदर्शनास आलेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हडपसर (जि.पुणे) येथील चिंतामणी नगर येथील पालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन विभागाच्या गोदामाला आग लागून नुकसान झाल्याबाबत**

**(२) ११७० (२३-१२-२०१४). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील चिंतामणी नगर येथील पालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन विभागाच्या गोदामाला आग लागून लाखो रुपयांच्या साहित्याचे नुकसान झाल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोदामाच्या शेजारील जैन टॉऊनशीपमधील तीन सदनिकांचे संसार उपयोगी साहित्यही आगीत जळाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार नुकसानग्रस्त कुटुंबांना शासनाने आर्थिक मदत दिली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :** (१) दिनांक ४.११.२०१४ रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास अचानक आग लागून झालेल्या दुर्घटनेत पालिसांनी केलेल्या पंचनाम्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या गोडाऊनमधील साहित्य व जैन टॉऊनशीपमधील ८ रहिवाशांचे साहित्यापोटी एकूण रुपये ५.९६ लाख इतक्या रक्कमेचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविला आहे.

(२) पुणे महानगरपालिकेकडील अभिलेखानुसार सदर गोदामाला आग लागल्याने शेजारील जैन टॉऊनशीपमधील ५ सदनिकांचे नुकसान झाल्याची नोंद असून, पोलिसांनी केलेल्या पंचनाम्यानुसार एकूण ८ सदनिकातील साहित्याचे नुकसान झाल्याची नोंद आहे.

(३) सदर प्रकरणी पुणे महानगरपालिकेने वानवडी पोलिस स्टेशन, पुणे यांना दिनांक १५.११.२०१४ च्या पत्रान्वये आग दुर्घटनेबाबत तपास करण्याबाबत विनंती केली असून, पोलिस विभागाकडून चौकशी सुरु आहे.

(४) स्थायी समितीच्या दिनांक ११.११.२०१४ रोजीच्या बैठकीत स्थानिक नगरसेविका यांनी संबंधितांना योग्य भरपाई देणेबाबत मागणी केली होती. परंतु पुणे महानगरपालिकेमार्फत दुर्घटनाग्रस्त सदनिकाधारकांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेचा विकास आराखडा प्रलंबित असल्याबाबत**

**(३) १५१३ (२३-१२-२०१४). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेचा विकास आराखडा सन १९८४ पासून शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर विकास आराखड्याबाबत शासनाने पर्यटकांकडून हरकती मागविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील विषयावर जनसुनावणी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकास आराखडा रखडल्यामुळे विकासकामे न होवून पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर विकास आराखडा मंजूर करण्याबाबत आर्थिक तरतूद करणेबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. शासनाने दि.२६/०३/२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेच्या विकास योजनेस भागश: क्षेत्रासाठी मंजूरी दिली असून उर्वरित वगळलेल्या भागाची विकस योजना शासनाने दि.१५/०१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूर केली आहे.

(२) सदर विकास योजना हरकती / सूचना मागविण्यासाठी अधिनियमाच्या कलम २६ अन्वये दि.२१/०१/२०१० रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना देखील हरकती / सूचना मागविण्यासाठी अधिनियमाच्या कलम ३१ (१) अन्वये दि.२६/०९/२०१३ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

(३) हे खरे नाही. वरील विषयावर प्राप्त सूचना व हरकतीच्या अनुषंगाने संबंधित हरकत/सूचना धारकांना प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रितसर सुनावणी देऊन उपस्थित सूचना / हरकत धारकांचे म्हणणे एकूण घेतले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) शासनाने विकास योजना मंजूर करतांना कोणतीही आर्थिक तरतूद करणेची आवश्यकता नाही.

---

## जेएनपीटीतील पाचव्या टर्मिनलच्या जेट्टीचा भराव करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खारफुटीची तोड केली जात असल्याबाबत

**(४) १५४३ (२३-१२-२०१४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटीतील पाचव्या टर्मिनलच्या जेट्टीचा भराव करण्यासाठी मोठया प्रमाणात खारफुटीची तोड केली जात असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारफुटीच्या तोडीबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन होत नसल्याबाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापी कोणतीही कारवाई केली नसल्यास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :**(१), (२) व (३) नाही.

जेएनपीटीतील पाचव्या टर्मिनलच्या विकासाचा कोणताही प्रकल्प अस्तित्वात नाही किंवा अवैधरित्या खारफुटी वनस्पतीची तोड होत नाही. तथापि, जेएनपीकडील स्टॅंडअलोन कंटेनर हाताळण्यासाठी काही जमिनीचा विकास करण्यात आला आहे. त्यासाठी जेएनपीटीने केंद्र शासनाचा पर्यावरण व वन विभाग व मा.उच्च न्यायालयाचीही परवानगी घेतली आहे.
(४) प्रश्न उद्‌भतव नाही.

---

**कल्याण शहरातील घन कचऱ्याचा मोठ्या प्रमाणावर प्रश्न निर्माण झाल्याबाबत**

**(५) ४०८३ (२३-१२-२०१४). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण शहरातील घन कचरा टाकण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) या डम्पिंग ग्राऊंड संदर्भात मा.उच्च न्यायालयात नागरिकांनी के.डी.एम.सी.विरोधात अवमान याचिका दाखली केली हे खरे आहे काय या आदेशाची पायमल्ली झाली आहे काय, सदरचा घनकचरा टाकण्याच्या जागेची क्षमता संपली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) या डम्पिंग ग्राऊंड मुळे संपूर्ण कल्याण शहरात दुर्गंधी, प्रदुषण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पर्यायी व्यवस्था उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण होणारा कचरा आधारवाडी येथील क्षेपणभूमीवर महानगरपालिके मार्फत टाकण्यात येतो. सदर आधारवाडी क्षेपणभूमीची क्षमता संपुष्टात आली आहे. त्यामुळे आधारवाडी क्षेपणभूमी बंद करण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१८२/२००९ दाखल केलेली आहे.
(३) हे खरे नाही. कार्यरत कचरा डेपोवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत नियमितपणे दैनंदिन बायोकल्चर द्रव्य, हार्बो स्प्रे व नॅचरल सिलीकेट पावडर इ.दुर्गंधी नाशकांची फवारणी दोन सत्रात करण्यात येत असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) आधारवाडी येथील क्षेपणभूमीची क्षमता संपुष्टात आल्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्यावर मौजे उंबर्डे, बारावे व मांडा येथे प्रक्रिया करुन भरावभूमी विकसित करण्याची कार्यवाही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील उरुळी कांचन गावास नगर परिषदेचा दर्जा मिळण्याबाबत**

**(६) ६२८१ (०६-०७-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील उरुळी कांचन येथील ग्रामस्थांनी मा.नगरविकास राज्यमंत्र्यांची दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी भेट घेऊन उरुळी कांचन गावास नगर परिषदेचा दर्जा मिळावा अशी मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरुळी कांचन ग्रामपंचायतीची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून सध्या ४० हजार पेक्षाही जास्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उरुळी कांचन ग्रामपंचायती कडून सन २०१० मध्ये नगर परिषदेचा दर्जा मिळावा म्हणून शासनास प्रस्ताव पाठविण्यात येऊनही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उरुळी कांचन ग्रामपंचायतीस नगर पालिकेचा दर्जा देण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांना महाराष्ट्र नगरपंचायत औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतुदीनुसार स्वयंस्पष्ट प्रस्ताव सादर करण्याचे सुचित केले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील रेल्वे वाहतुकीसाठीची समस्या सोडविण्याबाबत**

**(७) ६९९९ (०६-०७-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील रेल्वे वाहतुकीसाठीची समस्या सोडविण्यासाठी मा.केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी ठाणे येथील एका बैठकीमध्ये ठाणे मनोरुग्णालयाच्या जागेवर विस्तारित रेल्वे स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे मनोरुग्णालयाच्या जागेवर विस्तारित रेल्वे स्टेशन उभारण्यासाठी येथील लोकप्रतिनिधींनी सन २००४ पासून शासनाकडे सातत्याने मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :**(१) नाही.

दिनांक १.१.२०१५ रोजी ठाणे येथे झालेल्या बैठकीमध्ये ठाणे महानगरपालिकेमार्फत नियुक्त तज्ञ सल्लागार मे. बालाजी रेलरोड सिस्टिमस् लि. यांनी प्रस्तावित उपनगरीय रेल्वेस्थानकासाठी तयार केलेल्या पर्यायी अभियांत्रिकी नकाशांची सुसाध्यता तपासून प्रकरणी पुढील योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना मा.केंद्रीय रेल्वे मंत्री यांनी महाप्रबंधक, मध्य रेल्वे यांना दिल्या आहेत.

(२) होय.

(३) ठाणे येथील रेल्वे वाहतुकीसाठीची समस्या सोडविण्यासाठी ठाणे आणि मुलुंड दरम्यान नवीन उपनगरीय रेल्वे स्थानक /रेल्वे टर्मिनस विकसीत करणे प्रस्तावित आहे.

प्रकरणी मध्य रेल्वेने सुचविल्यानुसार वरील प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी करणेसाठी ठाणे महानगरपालिकेमार्फत तज्ञ सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्त तज्ञ सल्लागार मे. बालाजी रेलरोड सिस्टिमस् लि. यांनी प्रस्तावित उपनगरीय रेल्वेस्थानकासाठी पर्यायी अभियांत्रिकी नकाशे (Engineering Scale Plans : ESPs) तयार केले असून ते मध्य रेल्वेकडे मंजुरीस्तव सादर करण्यात आले आहेत.

सादर केलेल्या पर्यायी अभियांत्रिकी नकाशास मध्य रेल्वेची प्राथमिक मंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव (ता.जि.नाशिक) महानगरपालिकेने येथील सर्व्हे नं. १२१ ही जागा आरक्षित केली असतांना खोटे ले आऊट करुन जागेची विक्री केल्याबाबत

**(८) ७५४९ (०७-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (ता.जि.नाशिक) महानगरपालिकेने येथील सर्व्हे नं.१२१ ही जागा आरक्षित केली असतांना बनावट ले आऊट तयार करुन सदरहू जागेची विक्री केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व्हे नं.१२१ ची आरक्षित जागेची विक्री बंद करणेबाबत व बनावट व्यवहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :**(१) मालेगांव शहराची पहिली सुधारित विकास योजना शासनाने दि.२०/२/१९८६ रोजी मंजूर केली त्यामधील उक्त सव्हे क्र.१२१ वरील आरक्षण क्र.१६७ बगीचा करीता जागा मालकाने १९९४ मध्ये कलम १२७ ची खरेदी नोटीस दिली होती. त्या अनुषंगाने सदर आरक्षण व्यपगत झाल्याने महानगरपालिकेने १९९६ मध्ये तात्पुरती परवानगी दिली व त्यानंतर २००१ मध्ये सुधारीत परवानगी दिलेली असल्याचे दिसते. मात्र मालेगांव शहराच्या दुसरी सुधारीत विकास योजनेमध्ये उक्त सर्व्हे क्र.१२१ वर पुन:श्च आरक्षण क्र.२९१

बेघरांसाठी घरे आरक्षण दर्शविले आहे. महानगरपालिकेने आरक्षित जागेवरील अनधिकृत भुखंडाची खरेदी करु नये व कुठल्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये या आशयाची दि.१७/१/२०१५ रोजी जाहीर नोटीस दिलेली आहे.

(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील तरतुदी व अशा समकक्ष प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अनुषंगाने प्रकरण शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर शहरातील (जि.रत्नागिरी) राजीव गांधी क्रीडांगणामध्ये अद्यापही सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(९) ९३७६ (०९-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर शहरातील (जि.रत्नागिरी) राजीव गांधी क्रीडांगणामध्ये अदयापही सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त क्रीडांगणामध्ये शौचालय, बैठक व्यवस्थेसह कायमस्वरुपी पाणी पुरविण्यात यावे अशी मागणी अनेक वर्षापासून स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सुविधां अभावी सदरील मैदानावर शालेय क्रीडा स्पर्धा भरविणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त क्रीडांगणामध्ये आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) या स्वरुपाची मागणी केली नाही. तथापि, क्रिडास्पर्धा असताना नगर परिषदेकडून पाण्याचा टँकर उपलब्ध केला जातो. मैदानाचे कंपाऊंड लगत दोन्ही बाजूला नगरपरिषदेचे सार्वजनिक शौचालये असून सदर मैदानात पुरुष व स्त्रियांसाठी स्वतंत्रपणे नवीन प्रसाधनगृह बसविण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षात शालेय क्रिडा स्पर्धा संबंधित शाळांकडून घेण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर नगरपालिकेने लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणाकरिता मंजुर झालेला निधी इतरत्र खर्च केला असल्याबाबत**

**(१०) १०१८३ (०६-०४-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे माजी गृहमंत्री लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे कोल्हापूर येथील पूर्णकृती पुतळ्याच्या सुशोभिकरणाकरिता शासनाच्या नगरविकास विभागाने सन २००८ मध्ये कोल्हापूर नगरपालिकेला २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या नगरविकास विभागाने कोल्हापूर नगरपालिकेला २० लक्ष रुपयांचा निधी पुतळ्याच्या सुशोभिकरणाकरिता खर्च करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर नगरपालिकेने सदरचा निधी लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणाकरिता मंजुर असतांना तो इतरत्र खर्च केला असल्याने मंजूर झालेल्या कामाला तो मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) कोल्हापूर महानगरपालिकेने सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी रु.२०.०० लक्ष इतक्या रकमेची तरतूद केली असून सद्य:स्थितीत सदर काम निविदा स्तरावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर महापालिका शाळांतील गोरगरीब विद्यार्थ्यांना ई-लर्निंग करिता ३२ लाख मंजूर केल्याबाबत**

**(११) १२८३३ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महापालिका शाळांतील गोरगरीब विद्यार्थ्यांना ई - लर्निंग करिता ३२ लाख मंजूर झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतांनाही ठेकेदार प्रोजेक्टर देण्यास विलंब लावत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६)** :(१) हे खरे आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या ६४ म्युनिसिपल शाळांना ९९ एलसीडी प्रोजेक्टर पुरविणे या कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०१३-१४ मधून रक्कम रु.३२.३० लाख इतक्या तरतुदीस प्रशासकीय मान्यता प्राप्त होती.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पुरवठादार यांनी विहित मुदतीत एलसीडी प्रोजेक्टर न पुरविल्याने प्राथमिक शिक्षण मंडळाने पुरवठा आदेश रद्द करण्यात यावा असा ठराव संमत केला व त्यानुसार पुरवठा आदेश रद्द करण्यात आले.

---

**नागपूर येथील दिक्षा भूमीला अ वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करण्याबाबत**

**(१२) १२९३८ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दिक्षा भूमीला अ वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करावे, म्हणून दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) नगर विकास विभागाचा शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २००४ अन्वये तिर्थक्षेत्र विकास योजनेचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने तीर्थक्षेत्राचे वर्गीकरण करुन प्रस्ताव शासनास प्राप्त होणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांना शासन पत्र दिनांक ३ मार्च, २०१५ अन्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर सुधार प्रन्यास, व म.न.पा.हद्दीत येणारे भुखंड कंपोस्ट डेपो, बफर झोन या विविध आरक्षणामुळे नियमीत करणापासून वंचित असल्याबाबत**

**(१३) १४५७४ (०७-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यास व म.न.पा.हद्दीत येणारे भुखंड कंपोस्ट डेपो, बफर झोन या विविध आरक्षणामुळे नियमीत करणापासून वंचित असल्याने हजारो नागरिकांना होणारा त्रास दूर करण्याकरिता आरक्षण वगळण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागील २ वर्षापासून प्रलंबित प्रस्तावावर स्थापीत समितीने अद्याप पर्यंत निर्णय घेतला नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावावर निर्णय घेण्याचा निश्चित कालावधी किती,
(३) नसल्यास, प्रस्तावावर निर्णय न घेण्याचे प्रमुख कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :**(१) व (२) मौ.चिखली (खुर्द) व मौ.मानेवाडा एकूण क्षेत्र ७२.१५८४ हेक्टर आर ही जागा विकास योजनेतील कंपोस्ट डेपो (एस-१६१) या आरक्षणामधून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्याची अधिसूचना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१५/३३८/प्र.क्र.१९८/२०१५/नवि-९, दिनांक २५ जानेवारी, २०१६ अन्वये निर्गमित केली आहे.

कंपोस्ट डेपोच्या सभोवताल असलेल्या बफर झोनने बाधित असलेले ३६ अनधिकृत अभिन्यास, नागपूर सुधार प्रन्यासकडून नियमित करण्यात आले असून, या नियमित केलेल्या अभिन्यासातील भूखंड नियमित करण्याची प्रक्रिया नागपूर सुधार प्रन्यासकडून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा नगरपरिषद, जि.कोल्हापूर येथील सिटी सर्वे नं. ६४१ या जागेच्या मालकीबाबत**

**(१४) १४८०८ (०७-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पन्हाळा नगरपरिषद हद्दीतील सिटी सर्वे नं.६४१ ही जागा "पन्हाळा क्लब" या नावाने ओळखली जाते या जागेवर काही धनिकांनी खोटी कागदपत्रे तयार करुन "पन्हाळा क्लब" नामसदृश्य संस्था स्थापन करुन ताबा घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जागेची मालकी व ताबा कोणाकडे आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, खोटी कागदपत्रे करणा-यांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, यांच्या दिनांक २९/११/२००२ च्या आदेशानुसार चेअरमन, पन्हाळा क्लब यांचे नाव कमी करुन सरकार हक्क व व्यवस्थापन म्हणून पन्हाळा नगरपरिषद अशी नोंद सिटी सर्व्हेकडील रेकॉर्डला आहे. त्यानुसार जागेची मालकी शासनाकडे असून व्यवस्थापक म्हणू पन्हाळा नगरपरिषद आहे.
(३) याबाबत पन्हाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

---

### पंढरपूर शहरात चार प्रमुख यात्रा काळात होणारी गर्दी

**(१५) १६६९७ (१०-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहरात चार प्रमुख यात्रा काळात होणारी गर्दी आणि अरुंद रस्ते लक्षात घेऊन शासनाने मास्टर प्लॅनची रुपरेखा ठरविली असून त्याअनुषंगाने रस्त्याच्या दुतर्फा असणा-या ७०० लोकांना नोटीसा बजाविण्यात आल्या असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणा-या लोकांना एफएसआय नुसार वाढीव मोबदला तसेच पूर्ण बाधित होणा-या कुटूंबाला पर्यायी जागा देऊन त्यांचे नावे शासन प्रमाणपत्र तसेच मालमत्ताधारकांना किती एफएसआय देणार याबाबत शासनाने योग्य तो विचार करुन संबंधितांना याबाबत कळविण्यात आले वा येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

अशा प्रकारच्या नोटीस पंढरपूर नगरपरिषदेमार्फत देण्यात आलेल्या नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील दादर येथे इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारकाची निर्मिती करण्याबाबत

**(१६) १६७२५ (३०-०७-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथे इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारकाची निर्मिती करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या भुमिपूजनासाठी निश्चित तारीख ठरविण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, यासाठी संपूर्ण कृती आराखडा तयार करण्यात आला आहे काय, तसेच उक्त स्मारकासाठी आर्किटेक्चर (वास्तू विशारद) नियुक्ती, अंदाजित खर्च, कामाचा कालावधी याबाबतचा थोडक्यात तपशील काय आहे,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१६) :**(१) होय.

(२) सदर स्मारकाचे भूमिपजून दिनांक ११.१०.२०१५ रोजी सन्माननीय पंतप्रधान महोदय यांचे हस्ते पार पडलेले आहे.

(३) ते (५) प्रस्तावित स्मारकाचे विकासासाठी शासनाने यापूर्वीच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणुक केलेली आहे.

प्राधिकरणाने शासनाची मान्यता घेवून नियुक्त केलेले सल्लागार श्री.शशी प्रभू यांनी प्रस्तावित स्मारकाचा बृहत आराखडा तयार करणेची कार्यवाही सुरु केलेली आहे.

सर्व संबंधित व्यक्ती आणि संस्था यांच्याशी चर्चा करुन आराखडा अंतिम करण्यासाठी मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांची एक सदस्यी समिती दिनांक १४.३.२०१६ रोजी गठीत करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**नाशिक जिल्ह्यातील संगमेश्वर शिवार, मालेगांव येथील मौसम नदी पात्रातील ग्रीन बेल्टच्या आरक्षण जागेवर ले-आऊट टाकल्याबाबत**

**(१७) १९५५१ (११-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील संगमेश्वर शिवार, मालेगांव येथील मौसम नदी पात्रातील ग्रीन बेल्टच्या आरक्षण जागेवर ले-आऊट करुन होत असलेल्या प्लॉट विक्रीसंदर्भात चौकशी करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :**(१) होय.
(२) मंजूर विकास योजना, मालेगांव (दुसरी सुधारित) च्या प्रस्तावानुसार संगमेश्वर वॉर्डातील स.नं. ९२ पैकी व ९३ पैकी तसेच स.नं. ११८ व ११९ ही जागा मौसम नदी किनारी हरितपट्टा (Green Belt) मध्ये दर्शविण्यात आलेली असून सदर जागेवर जमीन मालकांनी अनधिकृत विकास केल्याचे निदर्शनास आल्यावर महानगरपालिकेने संबंधित जमीन मालकांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३ अन्वये नोटीसी बजावून त्यांचे विरुध्द संबंधीत पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने रुग्णालयांवर कायद्यातील तरतूदीप्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत**

**(१८) २१४८६ (१२-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैव वैद्यकीय कच-यांची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट न लावणा-या शहरातील ३८७ रुग्णालयांवर कायद्यातील तरतूदीप्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करण्याची सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोल्हापूर महानगरपालिकेला माहे मे, २०१५ च्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सूचनेनुसार आतापर्यंत किती रुग्णांलयावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे व पुढे त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उर्वरित रुग्णालयांवर केव्हापर्यंत कारवाई करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जयंती नाला येथे अज्ञातांकडून जैव - वैद्यकीय कचरा टाकलेबाबत शहरातील सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यवसायिकांवर फौजदारी खटला दाखल करणेबाबत कोल्हापूर महानगरपालिकेस कळविले होते. महानगरपालिका शहर हद्दीतील एकूण ३४६ वैद्यकीय व्यवसायिकांना कोल्हापूर महानगरपालिकेकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तथापि, जयंती नाला येथे जैव वैद्यकीय कचरा नेमका कोणी टाकला हे स्पष्ट होत नसल्याने अज्ञात व्यक्तिविरोधात शाहुपूरी पोलिस स्टेशन येथे एफ.आय.आर. नं.३७/२०१५ दि.१९/०५/२०१५ ने तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील अनधिकृत बांधकाम व पार्किंगबाबत

**(१९) २३१२५ (११-०८-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरामध्ये हजारो बांधकामे अनधिकृत व अनेक व्यावसायीकांनी पार्किंगचा वापरही व्यावसायीक कामासाठी करीत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांची नेमकी संख्या किती आहे, शासनाने या व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) व (२) अनधिकृत बांधकामाचे सर्व्हेक्षण करण्याचे कम सुरु असून आतापर्यंत निदर्शनास आलेल्या अनाधिकृत बांधकामावरती नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण ता.जि.रायगड येथील करळ-सावरखार, जसखार, सोनारी या गावांना जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांसाठी भुखंड देण्याबाबत**

**(२०) २३६०७ (१०-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण ता.जि.रायगड येथील करळ-सावरखार, जसखार, सोनारी या गावांना जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांसाठी केंद्र शासनाने मंजूर केलेली १११ हेक्टर जमिनीपैकी वाढीव गावठाण मिळाला असून इतर नऊ गावातील रहिवाशांना कमी भूखंड देण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, जेएनपीटी प्रकल्पासाठी जमिन संपादन झालेल्या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील प्रकल्पबाधितांसाठी जेएनपीटीतर्फे साडेबारा टक्के योजना राबविली जात असून बाधितांसाठी प्रत्यक्षात १६० हेक्टर जमिनीची आवश्यकता असतांना १११ हेक्टर जमिन केंद्र शासनाने मंजूर केली असून ४९ हेक्टर जमीन कमी झाल्याने प्रकल्पग्रस्तांना सुमारे २० टक्के जागा कमी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांना आवश्यक जमिन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :**(१), (२) व (३) जे.एन.पी.टी. प्रकल्पासाठी सिडकोने हस्तांतरीत केलेल्या जमीनीच्या भूधारकांना १२.५ टक्के योजनेचा लाभ देण्याबाबतचा निर्णय दि.१४.८.२०१४ च्या शासन निर्णयानुसार घेण्यात आला आहे.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी एकूण १६० हे. आवश्यक जमिनीपैकी जे.एन.पी.टी.ने १११ हे. जमीन महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरीत करण्यास सहमती दर्शविल्याने उक्त जमिनीचा ताबा घेणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना दि.१२.५.२०१५ च्या पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे. उर्वरित जमिनीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेत २० गावांचा समावेश करण्याचा प्रस्तावाबाबत**

**(२१) २४३१२ (११-०८-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रशासनाने शहरालगतच्या एक किलोमीटर परिसरातील सुमारे २० गावांचा समावेश महानगरपालिकेमध्ये करण्याकरिता प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी दिनांक ५ जून, २०१५ रोजी खास सभा महानगरपालिकेने बोलविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हद्दवाढ या एकाच विषयावर चर्चा करुन शहराचे हद्दवाढ प्रस्तावाला महानगरपालिकेने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हद्दवाढीमध्ये येणाऱ्या संबंधीत २० गावांतील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांची मते जानून घेणेकरिता दिनांक ३० मे, २०१५ रोजी महानगरपालिकेमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) सदर बैठकीमध्ये संबंधीत गावचे प्रतिनिधी व ग्रामस्थांनी कोल्हापूर शहराचे हद्दवाढीला तीव्र शब्दामध्ये विरोध केला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, लोकभावनेचा आदर करुन शासन महानगरपालिकेने दुसऱ्यांदा पाठवलेला हद्दवाढीचा प्रस्ताव फेटाळणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) याबाबतचा निर्णय शासनाच्या विचाराधिन आहे.

---

## पंढरपूर तालुक्यातील नगरपरिषदेच्या मेहतर समाजाच्या मैला सफाई कामगाराबाबत

**(२२) २५९६० (१०-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर तालुक्यातील नगरपरिषदेच्या मेहतर समाजाच्या मैला सफाई कामगार शहर स्वच्छतेसाठी कार्यरत आहेत, परंतु सदर कामगारांच्या निवासस्थानाचा प्रश्न गेली अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मैला सफाई कामगारांच्या मागण्या संदर्भात नगरपरिषदेने वेळोवेळी शासनाकडे बैठक होऊन त्यांना घर देण्याचा निर्णय होऊनही नगरपरिषदेत ठरावही झाला असुनही शासनाने सदर कामगारांची श्रम साफल्य योजनेअंतर्गत निवासस्थाने घेण्यास मेहतर समाजावर सक्ती केली जात आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाद्वारे मेहतर समाजविषयी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. पंढरपूर नगरपरिषदेने मेहतर समाजातील सफाई कर्मचारी यांना ५६ घरे बांधून दिली आहेत. सदरील घरे जागेवर कायमस्वरुपी नावावर करुन देण्याबाबत त्यांची मागणी आहे.
(२) याबाबत मा.राज्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचेकडे दि.१७/५/२०१६ रोजी झालेल्या बैठकीनुसार सामाजिक न्याय विभागाच्या दि.१९/८/१९८७ च्या शासन निर्णयानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.
(३) मुख्याधिकारी यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयाचा प्रादेशिक विकास आराखडा रखडल्याबाबत

**(२३) २८५१३ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयाचा पुढील २० वर्षाचा प्रादेशिक विकास आराखडा तयार करण्याचे काम मागील ९ वर्षापासून सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक विकास आराखडा नसल्यामुळे पर्यटन, नागरी विकास व ग्रामीण भागाचा विकास रखडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रादेशिक विकास आराखडयाची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदर आराखडा मंजुर होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कोल्हापूर जिल्हयासाठी प्रादेशिक योजना तयार करण्यासाठी कोल्हापूर प्रादेशिक नियोजन मंडळाची स्थापना शासनाने दि.२३/०२/२०११ रोजीच्या अधिसूचनेद्वारे केली आहे. सद्यस्थितीत कोल्हापूर प्रदेशाचा विद्यमान भू वापर नकाशा तयार झाला असून प्रारुप प्रस्तावित भू वापर नकाशा तयार करण्याचे काम सुरु आहे. तसेच प्रदेशातील विकासाचे सनियंत्रण करणेकामी प्रारुप विकास नियंत्रण नियमावली व बांधकाम नियमावली तयार करण्याचे काम देखील उपसंचालक, नगर रचना, प्रादेशिक योजना, कोल्हापूर यांचे कार्यालयामध्ये सुरु आहे.

(४) प्रादेशिक योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

---

### उल्हासनगर (जि.ठाणे) महापालिका आयुक्तांची मनाई असताना सपना गार्डन समोरील कॉक्रीट रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविले असल्याबाबत

**(२४) २९३२८ (२१-०६-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महापालिका आयुक्तांची माहे मार्च, २०१५ मध्ये रस्त्यावर पेव्हर ब्लॉकची कामे करण्यास मनाई केली असतानाही शहर अभियंत्यांपासून कनिष्ठ अभियंत्यापर्यंत सगळ्यांनीच आयुक्तांच्या आदेशाला डावलून सपना गार्डन समोरील कॉक्रीट रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविले असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ मार्च, २०१५ ला महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम खात्याला पेव्हर ब्लॉकच्या कामाचा दर्जा चांगला नसल्याने सदरची कामे जास्त काळ टिकत नसल्याने पेव्हर ब्लॉकची कामे न करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ बाबत प्रशासनाचे आदेश धुडकावून लावणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांनी माहे २०१४ मध्ये रस्त्यावर पेव्हर ब्लॉकची कामे करण्यास मनाई केली असतांनाही सपना गार्डन समोरील कॉंक्रीट रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी निदर्शनास आले.

तथापि सपना गार्डन समोरील कॉंक्रीट रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम हे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले नसून या कामाचे प्राकलन किंवा निविदा कारवाई सुध्दा महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली नाही.

त्यामुळे शहर अभियंत्यापासून कनिष्ठ अभियंत्यापर्यंत सर्वानीच आयुक्तांच्या दिनांक ०१ मार्च, २०१४ रोजीच्या आदेशाचे पालन न करता सपना गार्डन समोरील कॉंक्रीट रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविले हे खरे नाही.
(२) उल्हानगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम खात्याला पेव्हर ब्लॉकच्या कामाचा दर्जा चांगला नसल्याने सदरची कामे जास्त काळ टिकत नसल्याने पेव्हर ब्लॉकची कामे न करण्याचे आदेश दिनांक १ मार्च, २०१४ रोजी देण्यात आले होते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुबईतील नरिमन पॉईट ते कांदीवलीपर्यंत कोस्टल रोड तयार करण्याबाबत**

**(२५) २९३४१ (२१-०१-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नरिमन पॉईट ते कांदीवली पर्यंत कोस्टल रोड तयार करण्याचा निर्णय शासनाने माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोस्टल रोडच्या बांधकामास किती खर्च अपेक्षित आहे व त्यासाठी किती कालावधी लागणार आहे, तसेच बांधकाम कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर रोडला स्थानिक रहिवाश्यांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रोडमुळे बाधित रहिवाश्यांचे पुनर्वसनासाठी कोणती उपाययोजना केली आहे,
(५) असल्यास, सदर कोस्टल रोड संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :**(१) मुंबईच्या दररोजच्या वाहतुक कोंडीवरील उपाय म्हणून कोस्टल रोडचा (नरिमन पॉईंट-बोरीवली) पर्याय पुढे आलेला होता. त्यास अनुसरुन कोस्टल रोड संदर्भात पर्यावरण विभागाकडील दि.३०/६/२०११ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण, बांधकाम वगैरे क्षेत्रातील तज्ञांचा समावेश असलेल्या संयुक्त तांत्रिक समितीची (अध्यक्षांसह ११ सदस्य) नियुक्ती करण्यात आली. सदर समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला होता. समितीच्या अहवालामध्ये मुंबईच्या किनारपट्टीने ३५.६० कि.मी. चा कोस्टल रोड प्रस्तावित असून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु झालेली आहे.
(२) कोस्टल रोडच्या बांधकामास अंदाजे रु.१२००० कोटी खर्च अपेक्षित आहे व सदर कामास ३ वर्षे कालावधी अपेक्षित आहे. सदरचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात येणार आहे.
(३) प्रश्नाधीन कोस्टल रोडचा विस्तृत प्रारुप प्रकल्प अहवाल हा बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जनतेच्या सूचनांसाठी/हरकतीसाठी २५ जून २०१५ ला उपलब्ध केलेला होता. त्यावर अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती व इतर काही संस्था व व्यक्तींनी विरोध दर्शविलेला आहे.
(४) सदर रस्त्याच्या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या रहिवाश्यांचे पुनर्वसन कायद्याप्रमाणे केले जाईल.
(५) सदर रस्त्याच्या प्रारुप प्रकल्प अहवालामध्ये पर्यावरणीय दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्यात आलेले आहे. पूर्ण प्रकल्पाचे पुनर्विलाकनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींचे अवलोकन करणे व नागरिकांच्या सूचना/हरकती विचारात घेवून प्रकल्पाचे पुढील तपशीलवार अंदाजपत्रक/आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार करणे अभिप्रेत आहे.
(६) लागू नाही.

---

### मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्प व ओशिवरा जिल्हा केंद्राच्या वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाबाबत

**(२६) ३०४४८ (२१-०१-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्प व ओशिवरा जिल्हा केंद्राच्या वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात येणार असल्याचे आश्वासन सन्मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) ते (३) धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या विकास विषयक प्रस्तावास मंजूरी देणेच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे दिनांक १२.८.२०१५ रोजी बैठक पार पडलेली आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या विकास विषयक प्रस्तावास मंजूरी देणेत आलेली असून त्याबाबतची अधिसूचना दिनांक ३.३.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये विशेषत्वाने वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाचा मुद्दा नाही.

ओशिवरा जिल्हा केंद्राच्या मंजूर विकास विषयक प्रस्तावामध्ये फेरबदल मंजूर करणेच्या अनुषंगाने बाब अंतर्भूत होती. यासंदर्भात फेरबदलास मंजूरी देणेत आलेली असून त्याबाबतची अधिसूचना दिनांक १८.११.२०१५ रोजी निर्गमित झालेली आहे त्यामध्ये वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकास मंजूरी देणेची बाब अंतर्भुत आहे.

---

**धुळे शहरातील चटई क्षेत्र वाढीला मान्यता मिळणेबाबत**

**(२७) ३०४६२ (२३-१२-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहरातील चटईक्षेत्र वाढविला जात नसल्यामुळे बहुमजली इमारतींच्या कामाला अडथळा आल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे शहरातील दुकाने व घरांच्या भाड्यात पाचपट वाढ झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरात जागेचे चटई क्षेत्र वाढीला मान्यता देऊन शासनाने नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :**(१), (२) व (३) धुळे महानगरपालिका ही "ड" वर्ग महानगरपालिका असून शासनस्तरावर राज्यातील (मुंबई महानगर प्रदेश वगळता) "ड" वर्ग महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) प्रमाणे विकास नियंत्रण नियमावली प्रसिध्द करुन हरकती/सुचना मागविण्यात आल्या होत्या, प्राप्त हरकती/सूचनांच्या अनुषंगाने सह संचालक नगररचना, नाशिक विभाग यांचेकडे

दि.१६/०२/२०१६ रोजी सुनावणी झाली असून त्यांनी शासनास सादर केलेल्या अहवालाचे संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे छाननी करण्याचे काम प्रगती पथावर आहे. सदर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. उक्त “ड” वर्ग महानगरपालिकेसाठीची विकास नियंत्रण नियमावली मंजूर झाल्यानंतर त्याप्रमाणे धुळे शहरासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कामोठे, खारघर, कळंबोली गावे नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करणेबाबत**

**(२८) ३०७३७ (२१-०१-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामोठे, खारघर, कळंबोली ही गावे नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करुन त्यांचा विकास करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक नागरिकांकडून सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) अशा आशयाची निवेदने प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, दि.१६/०५/२०१६ अन्वये पनवेल नगरपरिषद व सभोवतालच्या ६८ गावांचा स्थानिक परिसर, अधिक मोठे नागरी क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा, तसेच हे अधिक मोठे नागरी क्षेत्र पनवेल शहर महानगरपालिका म्हणून घटीत करण्याबाबतचा इरादा शासनाने जाहीर केला आहे.

या प्रस्तावित महानगापालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात कामोठे, खारघर, कळंबोली या गावांचा समावेश करण्याचा शासनाचा इरादा आहे.

---

**मुंबई शहराच्या विकास आराखडयास शासनाने मुदतवाढ दिल्याबाबत**

**(२९) ३१९६८ (२१-०१-२०१६). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहराच्या विकास आराखडयास शासनाने मुदतवाढ दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मुंबई शहराचा विकास आराखडा तातडीने तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६)** :(१) होय.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने यापूर्वी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास आराखड्यामधील चुका/त्रुटी यांची दुरुस्ती करणेसंदर्भातील कामाची गुंतागुंत विचारात घेता तसेच पारदर्शक व अचूक आराखडा तयार करण्यासाठी मुदतवाढ देणेची मागणी केलेने, शासनाकडून दिनांक ३१.५.२०१६ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेत आलेली आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २७.५.२०१६ रोजी सुधारित प्रारुप विकास आराखडा नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी प्रसिध्द केलेला आहे.

---

**मालेगाव महानगरपालिका (जि.नाशिक) विकास आराखडा योजनेत जागेचा गैरवापर होत असल्याबाबत**

**(३०) ३३१३७ (२१-०१-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव महानगरपालिका (जि.नाशिक) विकास आराखडा योजनेमध्ये जागेचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होत असलेल्या प्रकरणाची चौकशी होण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.प्रधान सचिव नगरविकास विभाग मंत्रालय, यांना दि.१५/१/२०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर चौकशी होण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६)** :(१) होय.

(२) मालेगांव महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर विकास योजना, मालेगोव (दुसरी सुधारित) च्या प्रस्तावा नुसार आरक्षित असलेल्या खाजगी मालकीच्या जागांवर काही जमीन मालकांनी अनधिकृतरित्या लहान लहान भुखंड पाडलेले आहेत. सदर आरक्षित जागांवर अनधिकृतरित्या पाडलेल्या भुखंडाची खरेदी करु नये तसेच कुठल्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये या आशयाची जाहिर नोटीस महानगरपालिकेने स्थानिक वर्तमान पत्रांत प्रसिध्द केली आहे व काही जमीन मालकां विरुध्द संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच ज्या जमिन आरक्षित आहेत अशा ठराविक जमिनींचे सर्व्हे नंबर नमुद करुन या जागांवरील भुखंडाची खरेदी करु नये वा बांधकामे करु नये या आशयाची देखील जाहिर नोटीस मालेगांव महानगरपालिकेने प्रसिध्द केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई भागात मूलभूत सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३१) ३३२०० (२१-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई भागात मूलभूत सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सविस्त प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) नेमण्याचे महानगरपालिका प्रशासनाने निश्चित केले असून याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

दिनांक १४/५/२०१५ रोजी राज्य शासनाने काढलेल्या परिपत्रकानुसार सातारा-देवळाई हा भाग महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाल्याने या भागामध्ये मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (पीएमसी) नियुक्ती करण्यासाठी दिनांक २८/०८/२०१५ रोजी सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत "आश्रय योजनेअंतर्गत" सफाई कामगारांना सेवानिवासस्थाने उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) ३३६४१ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत "आश्रय योजनेअंतर्गत" सफाई कामगारांना सेवानिवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या नियमावलीत क्र.३३ मध्ये नियम क्र. ३३ (२६) नव्याने समाविष्ट करण्याकरिता, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत मुंबई महापालिकेने राज्य शासनास दिनांक २७ डिसेंबर, २०१३ रोजी सादर केलेल्या प्रस्तावास अद्‌याप शासनातर्फे मंजूरी देण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास विनाविलंब मंजूरी मिळावी याकरीता दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित प्रस्तावास अद्याप शासनाने मंजूरी न देण्याची व त्यास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे व यावर शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय,

(४) तसेच उक्त प्रस्वावास किती निश्चित कालावधीत शासनाकडून मंजूरी मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६)** :(१) ते (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडील दिनांक २३.४.२०१४ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मध्ये आश्रय योजनेंतर्गत सफाई कामगारांच्या सेवा निवासस्थानासाठी ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणेसाठी नवीन विनियम ३३(२६) अंतर्भुत करणेचा प्रस्ताव शासनास सादर झालेला होता.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सादर केलेला प्रस्ताव फक्त सफाई कामगारांच्या सेवा निवासस्थानापुरता मर्यादित होता. पोलीस कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, महानगरपालिकेकडील इतर कर्मचारी निवासस्थाने, राज्य शासन तसेच राज्य शासनाची प्राधिकरणे यांच्या कर्मचारी निवासस्थानाचाही मुद्दा असल्याने शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सर्वसमावेशक अशी तरतूद करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अंतिमत: शासनाकडील दिनांक २.९.२०१५ रोजीच्या अधसूचनेन्वये सफाई कामगारांच्या निवासस्थानासह राज्य शासन, राज्य शासनाची प्राधिकरणे, महानगरपालिका कर्मचाऱ्यांची निवासस्थाने यासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेसाठी विनियम ३३(३)(A) मध्ये फेरबदल मंजूर करणेत आलेला आहे.

वरील बाब विचारात घेता महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावावर कार्यवाही करण्याची आवश्यकता राहिलेली नसल्याने सदर प्रस्ताव नामंजूर करुन दप्तरी दाखल करणेत येत असलेचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक ७.१.२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.

---

### परभणी महानगरपालिकेच्या शाळेंची दयनीय अवस्था झाल्याबाबत

**(३३) ३४७७७ (२१-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेच्या सुमारे ७ ते ८ ठिकाणी शाळा सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शाळांमध्ये सोयीसुविधा न पुरविल्यामुळे बंद पडल्या आहेत व चालू असलेल्या शाळांची दयनीय अवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६)** :(१) परभणी शहर महानगरपालिकेला एकुण १७ प्राथमिक शाळा सुरु आहेत.

(२) महानगरपालिका परभणी अंतर्गत १६ प्राथमिक शाळा मध्ये भौतिक सुविधा उपलबध असून एक शाळा प्रा.शा.शा.क्र.३ शंकर नगर, या शाळेची इमारतीची दयनीय अवस्था झाल्यामुळे हि शाळा या वर्षी महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीत स्थालांतरीत करण्यात येणार आहे. या वर्षी या शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश, बुट, सॉक्स महानगरपालिकेच्या स्तरावर देण्यात आले आहे. शसनाकडून प्राप्त होणाऱ्या सर्व सोयी सुविधा या शाळांना देण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परभणी महानगरपालिकेच्या रुग्णालयात सोयीसुविधा नसल्याबाबत

**(३४) ३४७५८ (२१-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे एकमेव रुग्णालय शहरात कार्यरत आहे, या रुग्णालयाकडून लसीकरणा व्यतिरिक्त कुठलेही प्राथमिक उपचार रुग्णांना देण्यात येत नाहीत व तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्याचे शासनाचे आदेश असतानाही एकही तज्ञ डॉक्टरांची निवड केली गेली नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महानगरपालिकेचे रुग्णालयात आयसोलेशन वार्ड, प्रसूती कक्ष व खाटांची सुविधा असणे बंधनकारक आहे या तिन्ही बाबी महानगरपालिका रुग्णालयात उपलब्ध नाहीत, या सर्व नियमांना बगल देऊन महानगरपालिकेकडून देखावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत परभणी महानगरपालिका हद्दीमध्ये ६ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीस मंजुरी मिळाली असतानाही अद्यापही दवाखाने सुरु झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :**(१) परभणी शहर महानगरपालिकेचे एकमेव रुग्णालय असून तेथे लसीकरणासह सर्व प्रकारचे प्राथमिक उपचार केले जातात. परभणी शहर महानगरपालिकेचे सेवा प्रवेश नियम अंतीम न झाल्यामुळे आकृतीबंधानुसार पदे/तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती/निवड करणे शक्य होत नसल्याने कंत्राटी पध्दतीने कंत्राटी डॉक्टरांना आवश्यकतेनुसार बोलविण्यात येते.

(२) महानगरपालिका परभणी मध्ये आयसोलेशन कक्ष कार्यरत आहे व बाह्य रुग्ण विभाग, टि.बी.साठी सुक्ष्मदर्शीका केंद्र, लसीकरण व बळकटीकरण विभाग, कुष्टरोग विभाग, (शोध व उपचार) माता बाल संगोपन केंद्र या सुविधा उपलब्ध आहेत. प्रसुती कक्ष व खाटाची सुविधा नाही.

(३) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत परभणी महानगरपालिकेस ६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाले असून ३ आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. तर उर्वरित ३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत ही केंद्र अर्ध वेळ चालू आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपुर उत्तर विभागातील जलवाहिन्या व जलकुंभाची निर्मिती होणेबाबत**

**(३५) ३६२१५ (२१-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर उत्तर विभागातील वस्त्यांमध्ये जलवाहिन्या कालबाह्य झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) नागपुर उत्तर विभागातील अनेक वस्त्यातील कालबाह्य जलवाहिन्या बदलून नविनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, नागपुर उत्तर विभागातील जलवाहिन्याकरीता नगरविकास विभागाने निधीची तरतूद केली आहे काय,

(४) असल्यास, नागपुर उत्तर विभागातील कालबाह्य जलवाहिन्या बदलविण्याकरिता मा.मुख्यमंत्री यांच्या निधीतुन निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) सर्वच जलवाहिन्या कालबाह्य झाल्या आहेत, हे खरे नाही.

(२) केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान (JMMURM) योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने २४x७ पाणीपुरवठा योजना मंजूर असून, या योजनेतंर्गत नागपूर शहरातील कालबाह्य जलवाहिन्या बदलवून नविनीकरण करण्याची कामे सुरु आहेत. यात उत्तर नागपूरातील वस्त्यांचा सुध्दा समावेश आहे.

(३), (४) व (५) केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजूर रु.३८७.८६ कोटीच्या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने रु.७७.५७ कोटी व राज्य शासनाने रु.३१.०२ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान मार्च २०१४ रोजी संपुष्टात आले असल्याने, सदर प्रकल्पासाठी उर्वरीत निधी केंद्र शासनामार्फत आता वितरीत केला जाणार नाही. सबब सदर प्रकल्प नागपूर महानगरपालिकेने स्वनिधीतून पूर्ण करणे आवश्यक आहे.

---

**पुणे शहरातील खेळाच्या मैदानाचे काम २५ वर्षापासून अपूर्ण असल्याबाबत**

**(३६) ३८००९ (२०-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील खेळाचे मैदान भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टेडियमचे जन्मशताब्दी वर्षात सुरु झालेले काम २५ वर्षापासून अपूर्ण असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्टेडियमचा मूळ आराखडा बाजूला ठेवून नविन काम करण्यात आले आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्टेडियमचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, या स्टेडियमचे काम मूळ आराखडयानुसार न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६)** :(१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा नावाचे स्टेडियम अस्तित्वात नाही. त्यामुळे जन्मशताब्दी वर्षात सुरु झालेले काम २५ वर्षापासून अपूर्ण असल्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या शहरांमध्ये खाजगी गृहनिर्माण योजनेत गरीब, मध्यमवर्गीयांसाठीची घरे श्रीमंत उच्चभ्रुच्या घरांपासून दुर बांधली जाणार असल्याबाबत**

**(३७) ३८२१६ (२१-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या शहरांमध्ये खाजगी गृहनिर्माण योजनेत गरीब, मध्यमवर्गीयासाठीची घरे श्रीमंत उच्चभ्रुच्या घरांपासून दुर बांधली जाणार व यासाठी शासनाने परवडणारी या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करुन या नव्या बदलात बिल्डरांच्या व श्रीमंत वर्गाचा अधिक विचार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमकुवत गट, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट इ. प्रत्येक प्रकल्पात विशेषत: गरीबांसाठी २० टक्के राखीव घरे ठेवण्याचे बंधनकारक करण्यात आले होते, मात्र राज्य शासनाने आता एकाच गृहनिर्माण प्रकल्पात गरीब व मध्यवर्गीयासाठी घरे बांधण्याचे बंधन काढून टाकण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गृहनिर्माण योजनेत गरीब मध्यवर्गीयासाठी बिल्डरधार्जिण धोरण आखल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्नोक्त भाग १, २ व ३ प्रकरणी शासनाने गरीब मध्यमवर्गीयांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कोणती उपाययोजना / धोरण आखले वा भविष्यात प्रस्तावित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :**(१) ते (५) अशी बाब नाही.

राज्यामध्ये दहा लक्ष व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये ४००० चौ.मी. वा त्यापेक्षा जास्त क्षेत्राच्या निवासी उद्देशाच्या रेखांकनामध्ये २०% भूखंड आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या व कमी उत्पन्न गटाच्या गृहबांधणीसाठी उपलबध करुन देणेच्या अनुषंगाने Inclusive Housing चे विनियम संबंधित महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भुत केलेले आहेत.

सदर विनियमांना मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.३६६/२०१४ सह एकंदर आठ रिट याचिकेद्वारे आव्हान देणेत आलेले होते. यासंदर्भात आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमी उत्पन्न गटाच्या गृहबांधणीसाठी देणेत यावयाचे भूखंड/सदनिका महानगरपालिकेच्या त्याच प्रशासकीय विभागात इतरत्र देणेची बाब मा.उच्च न्यायालयामध्ये मान्य करण्यात आलेली असून त्याप्रमाणे विनियमामध्ये बदल मंजूर करणेत आलेला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमी उत्पन्न गटाच्या गृहबांधणीसाठी देणेत यावयाचे भूखंड/सदनिका ह्या प्रकल्प ज्या महानगरपालिकेच्या प्रशासकीय विभागात आहे त्याच प्रशासकीय विभागात उपलब्ध होणार असल्याने गरीब मध्यमवर्गीय यांचे हित डावलले आहे अशी बाब नाही.

---

### मुंबई प्रारुप विकास आराखडा रद्द करण्यात आल्याबाबत

**(३८) ३८९६१ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई प्रारुप विकास आराखड्यात असलेल्या असंख्य त्रुटीमुळे विकास आराखडा शासनाने रद्द केला असून त्याचा आर्थिक फटका मुंबई महानगरपालिकेला बसल्यामुळे याबाबतची चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात मा.मुख्यमंत्र्यांनी सभागृहात आराखड्याच्या अनुषंगाने पोलीस व सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत केलेल्या घोषणेच्या अंमलबजावणीबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २८ मे, २०१५ रोजी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतच्या चौकशीचे काम पूर्ण झाले आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :**(१) अशी बाब नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २५.२.२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप सुधारित विकास योजनेस समाजाच्या सर्व स्तरातून प्रखर विरोध झालेला होता. सन २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये (प्रथम अधिवेशन) विधीमंडळामध्ये महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची समिती नेमून बृहन्मुंबई क्षेत्राच्या प्रसिध्द सुधारित प्रारुप विकास योजनेसंदर्भात अहवाल सादर करणेबाबत दिनांक ६.४.२०१५ रोजी विधीमंडळामध्ये निवेदन केलेले होते.

त्यानुसार मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करणेत आलेल्या समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेवून बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर चुका झाल्याचे निदर्शनास आलेवरुन शासनाने दिनांक २३.४.२०१५ रोजी प्रारुप सुधारित विकास योजना पुर्नप्रसिध्द करणेचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस निदेश दिलेले आहेत.

(२) होय.

पोलीस व सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे देण्याच्या विषयाबाबत बृहन्मुंबईच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम क्र.३३(३अे) अन्वये आवश्यक त्या तरतूदी करण्यात आल्या असून अंतिम अधिसूचना निर्गमित केली आहे व तसे सन्माननीय सदस्यांना मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांच्या स्वाक्षरीने उत्तर देणेत आलेले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जुन्या नाशिकची पुर्न:विकास योजना राबवुन ४ चटई क्षेत्र निर्देशांक देण्याबाबत**

**(३९) ३९०६१ (२१-०१-२०१६). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुने नाशिक शहर सुंदर व स्वच्छ होणेकरिता आणि नागरिकांना चांगल्या प्रकारच्या सेवा सुविधा मिळणेसाठी जुन्या नाशिकची पुर्न:विकास योजना राबवुन ४ चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची घोषणा तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेने ठराव करुन तसा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावानुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय, महासभा ठराव क्र.७५१, दि.१९/१०/२००१ नुसार दि.२६/८/२००४ रोजी मा.शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

(३) उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील प्राप्त अहवालात नमूद केलेनुसार गावठाण भागातील व्यावसायिकांचे स्थलांतरण गावठाण पुनर्वसन योजनेस कायदेशीर कोणतेही आधार नसणे व चटई क्षेत्र निर्देशांक वाढविल्यामुळे उपलब्ध मूलभूत सोयी सुविधावरील (Infrastructural Facilities) बोजा वाढून त्यामध्ये problem निर्माण होण्याची शक्यता इत्यादी बाबी विचारात घेऊन महानगरपालिकेचा उक्त गावठाण पुनर्विकासाचा प्रस्ताव नियोजनाचे दृष्टीने योग्य नसल्याने शासनाने दि.१५.०९.२०११ चे पत्रान्वये नामंजूर केलेला आहे.

दरम्यान नाशिक महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रसिध्द प्रारुप सुधारित विकास आराखड्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीनुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रात दाट लोकवस्तीचे क्षेत्रात (core area) ३० वर्षापेक्षा जास्त जुन्या ईमारतीचा पुनर्विकास करणेसंबंधी कल्स्टर डेव्हल्पमेंट अंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे.

(४) लागू नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांमधील शासकीय कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत समाविष्ट करून घेण्याबाबत**

**(४०) ४११५६ (१७-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांमधील शासकीय कर्मचाऱ्यांना कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट करून घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद आरोग्य विभागात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये पूर्णवेळ मदतनीस म्हणून काम पाहत असलेल्या परिचारिकांना महानगरपालिकेच्या सेवेत तात्पुरत्या मानधनावर समाविष्ट करून घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिचारिकांना महापालिकेच्या सेवेत तात्पुरत्या मानधनावर समाविष्ट करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांमधील ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत ४९९ कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

(२), (३) व (४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांमध्ये निळजे व आजदे या गावांचा समावेश आहे. या दोन गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता विविध संवर्गातील पद भरतीची प्रक्रिया सुरु आहे या विभागाकरीता अत्यावश्यक मनुष्यबळाची उपलब्धता होईपर्यंत उपरोल्लेखित दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कार्यरत असलेल्या परिचारिकांच्या सेवा जिल्हा परिषद, ठाणे यांच्यामार्फतच चालू ठेवण्यात आल्या असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

---

**धुळे शहरातील (जि.धुळे) कबीरगंज भागात शौचालयांची दुरावस्था झाल्याबाबत**

**(४१) ४१५६४ (१७-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील (जि.धुळे) कबीरगंज भागात शौचालयांची दुरावस्था झाल्याने परिसरात रोगराई पसरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील शौचालयांचे नवीकरण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :**(१) धुळे शहरातील कबीरगंज भागात महानगरपालिकेचे १० सीटचे शौचालय आहे. सदर शौचालयाची बारमाही देखभाल, दुरुस्ती व स्वच्छता करण्याबाबत सन २०११ पासून खाजगी संस्थेसोबत महानगरपालिकेने करारनामा केला असून, त्यानुसार रु.३०००/- च्या मर्यादेतील दुरुस्तीची कामे सदर संस्थेमार्फत करण्यात येतात.

सदर शौचालयांपैकी काही शौचालयांची फरशी, भांडे व आऊटलेट ड्रेनेज नादुरुस्त झाले असल्याने ती दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर शौचालय सद्यस्थितीत वापरात असून, या शौचालयामुळे रोगराई अथवा साथीचे रोग पसरत असल्याची वस्तुस्थिती नाही.

(२) धुळे महानगरपालिकेमार्फत शहरातील शौचालये दुरुस्ती कामाची जाहिर निविदा दि.१५.९.२०१५ रोजी मागविण्यात आली होती. तथापि, त्यास प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा दि.११.३.२०१६ रोजी मागविण्यात आली होती. त्यामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या असून, निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सदर शौचालये दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्णी नगरपरिषद (जि.यवतमाळ) पाणी पुरवठा योजनेत पी.एम.सी.ची नेमणूक करण्याकरिता काढण्यात आलेल्या ई- निविदाबाबत**

**(४२) ४१६०७ (१३-०५-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी नगरपरिषद (जि.यवतमाळ) पाणी पुरवठा योजनेत पी.एम.सी. ची नेमणूक करण्याकरिता काढण्यात आलेल्या ई-निविदेत नियमानुसार निविदेकरिता २५ दिवसांचा कालावधी देणे आवश्यक असतांना दिलेल्या तारखेनुसार २३ दिवसांचा कालावधी देण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदेकरिता देण्यात आलेल्या कालावधीत अनेक शासकीय सुट्टया येणे, तसेच निविदेतील अटी व शर्ती ठराविक कंत्राटदारांना समोर ठेवून टाकण्यात आल्याचे सदर निविदेच्या जाहिरातीवरुन स्पष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१६) :**(१), (२) व (३) सदर प्रकरणी काढण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार व अनियमितता झाल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने याप्रकरणी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, अमरावती विभाग, अमरावती यांनी सखोल चौकशी करावी व अनियमिता आढळून आल्यास तसा प्रस्ताव विहित मार्गाने शासनास पाठवावा, तो पर्यंत नगर परिषद, आर्णी यांनी प्रसिध्द केलेल्या पाणी पुरवठ्याच्या (भांडवली कामाच्या) मुख्य निविदा प्रक्रियेस दिनांक ०९/०३/२०१६ च्या पत्रान्वये स्थगनादेश देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील कार्यरत निदेशकांचे शिक्षक पदनाम करण्याच्या निवेदनाबाबत**

**(४३) ४३८२७ (०५-०५-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील कार्यरत निदेशकांचे शिक्षक पदनाम करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी, कराड (जि.सातारा) यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व मा.वित्त व नियोजन मंत्री आदींना दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**नागपूर महानगरपालिकेतील सफाई कामगारांना किमान वेतन मिळणेबाबत**

**(४४) ४४०२० (०५-०५-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतील सफाई कामगारांना किमान वेतन ११,५०० रुपये न देता फक्त ७,५०० रुपये वेतन दिले जाते व त्यांना आवश्यक सुविधा दिल्या नसल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या कामगार विभागाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ च्या अधिसूचनेत राज्यातील महापालिका क्षेत्रात काम करणाऱ्या अकुशल कामगारांना किमान वेतन ११,५००/- रुपये देणे बंधनकारक केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, किमान वेतन न दिल्यास कामगार विभागाकडून संबंधित पालिका अथवा ठेकेदारांवर कारवाई होणेही अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन नागपूर महानगरपालिकेतील सफाई कामगारांना किमान वेतन रु.११,५०० व इतर सोयी सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दिनांक २४/०२/२०१५ च्या अधिसूचनेद्वारे कामगारांच्या किमान वेतनाचे दर निश्चित करण्यात आले असून, त्याप्रमाणे ते लागू करण्याबाबत अपर कामगार आयुक्त, नागपूर कार्यालय यांनी महापालिकेला दिनांक १९/०३/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तद्नुषंगाने या अधिसूचनेन्वये निर्धारित किमान वेतन व भत्ते दिनांक १६/०४/२०१६ पासून संबंधीत कामगारांना देण्यात येत आहेत, असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(५) प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

**कल्याण महापालिकेत समाविष्ट असलेल्या २७ गावातील पाणी समस्याबाबत**

**(४५) ४५७६९ (०७-०५-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण महापालिकेत समाविष्ट असलेल्या २७ गावात पाणी समस्या तीव्र बनल्या आहेत ग्रामीण भागात होणाऱ्या अपुऱ्या आणि गढूळ पाण्यामुळे नागरिक हैराण झाले आहे पिण्यासाठी पाणी सुध्दा मिळत नसल्याने येथील नागरिकांनी रास्ता रोको आंदोलने करुन निषेध व्यक्त केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांतील नागरिकांना स्वच्छ व पुरेसा नियमीत पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) पाणी टंचाई कृती आराखडा-२०१६ अंतर्गत महानगरपालिकेकडून पालिका क्षेत्रातील विहिरींची साफसफाई, कुपनलिकांची दुरुस्ती, नविन कुपनलिका खोदणे व पाणी टंचाईग्रस्त भागात तात्पुरती पाणी पुरवठा योजना इत्यादी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. तसेच ज्या भागात पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, तथे महानगरपालिकेकडून टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

उपरोल्लेखित उपाययोजनांच्या माध्यमातून पाणी टंचाईवर काही प्रमाणात मात करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक सिडको येथील पेलीकन पार्क जागेच्या विकासाबाबत**

**(४६) ४७३७७ (१६-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघातील नाशिक सिडको येथील पेलीकन पार्क जागेच्या विकासाबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेलीकन पार्क विकासाचा आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६)** :(१) होय.

मा.सन्माननिय स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पेलिकन पार्क च्या जागेचा विकास करण्याच्या दृष्टीने त्यामध्ये सार्वजनिक वाहतुकीस बस स्थानक बांधणे, रिक्षा स्टॅण्ड तयार करणे, वैद्यकिय सुविधा केंद्र व व्यापार केंद्र निर्माण करणे यास प्राधान्य देण्यात यावे असे निवेदन दिले होते.

नाशिक सिडको येथील पेलिकन पार्क या जागेच्या विकासा संदर्भात नियोजन प्राधिकरण या नात्याने प्रशासक सिडको नविन नाशिक यांचे नाशिक महानगरपालिकेने अभिप्राय अपेक्षिले असल्याने त्यांनी खालील प्रमाणे महानगरपालिकेस कळविले आहे.

पेलिकन पार्कची जागा हि विकास आराखड्यात मध्यवर्ती बगीचा म्हणून दर्शविलेली आहे. सदर मोकळी जागा/खुली जागा याचा विकास हा आपण नमूद केलेल्या कारणांसाठी म्हणजेच सार्वजनिक वाहतुक, वैद्यकीय सुविधा केंद्र व व्यापार केंद्र याकरिता करावयाचा झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ नुसार बदलाकरिता प्रस्ताव शासनाच्या मंजुरीकरिता पाठवावा लागेल. मात्र असा प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोला महापालिकेतील अनेक रिक्त पदे भरण्याबाबत

**(४७) ४७७०२ (०५-०५-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महापालिकेतील अनेक पदे रिक्त असल्याने विशेषत: तांत्रिक पदे रिक्त असल्याने मागील १५ वर्षापासून या पदावर मानसेवी अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत या कर्मचाऱ्यांना दर सहा महिन्यांनी कामाचे आदेश दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांचे कामाचे आदेश संपुष्टात आल्यानंतर कर्तव्य पार पाडावे लागत असताना एखाद्यावेळी दुर्घटना घडल्यास अथवा हस्तक्षेप केल्यास यास कोण जबाबदार राहील असा प्रश्न या कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबियांना निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचा-यांना कायमसेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६)** :(१) दर सहा महिन्यानंतर एक किंवा दोन दिवसांच्या कालखंडानंतर अशा तांत्रीक कर्मचाऱ्यांना पुढील सहा महिन्यांकरिता अटी व शर्तीवर आदेश दिले जातात.

(२) ज्या कर्मचाऱ्यांचे आदेश संपुष्टात आलेले आहेत, अशा कर्मचाऱ्यांकडून महापालिका कोणतेही काम करुन घेत नाही अथवा असे आदेश पारित केले जात नाहीत.
(३) व (४) अकोला महानगरपालिकेचा आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम तयार करण्याचे काम महापालिका स्तरावर सुरु असून, आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमांना शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदरच्या आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमानुसार व आवश्यकतेनुसार प्रस्ताव महापालिकेसमोर ठेवण्याचे प्रस्तावित केले जाईल. असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

**औरंगाबाद शहरातील संत एकनाथ व संत तुकाराम नाट्यगृहाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याबाबत**

**(४८) ४९०७८ (१७-०५-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील औरंगाबाद महानगरपालिकेच्या संत एकनाथ नाट्यगृह व संत तुकाराम नाट्यगृहाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने या नाट्यगृहाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त नाट्यगृहांची दुरुस्ती करुन ते नाट्यगृह प्रेक्षकांसाठी खुले करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) संत तुकाराम नाट्यगृहाच्या दुरुस्तीकरीता रुपये ३५.८० लक्ष इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याकरिता महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.
नाट्यगृहातील खुर्च्यांची दुरुस्ती व इतर आवश्यक किरकोळ दुरुस्ती कॉर्पोरेट सामाजिक सहभागातून (CRS) करण्यात आली असून नाट्यगृह प्रेक्षकांसाठी खुले करण्यात आलेले आहे.
तसेच, संत एकनाथ रंगमंदिर येथील आसन व्यवस्था दुरुस्त करण्यात येऊन रंगमंदिर प्रेक्षकांसाठी खुले करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात कचऱ्याचे प्रचंड ढीग साचल्याबाबत**

**(४९) ४९१७३ (१७-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील कचरा उचलण्याची व्यवस्था व निर्माण होणारा कचरा यात ताळमेळ नसल्याने नाशिक शहरात कचऱ्याचे प्रचंड ढीग साचल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शहरात दुर्गंधी व साथीच्या रोगाचा फैलाव होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच जिल्ह्यातील खत प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु करण्याकरिता जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेली ६५ कोटीची यंत्रसामुग्रीही मनुष्यबळा अभावी पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक येथील कचरा समस्या सोडविण्याकरिता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
सदर खत प्रकल्पात दररोज येणाऱ्या सुमारे ३५० मे.टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी सदर यंत्रसामुग्रीचा आवश्यकतेनुसार वापर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगाव शहरातील जलवितरण वाहिन्यांची दुरुस्तीबाबत

**(५०) ५१६१९ (०३-०५-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव महानगरपालिका हद्दीतील जलवितरण वाहिन्यांची विविध ठिकाणी गळती होत असून नागरिकांना गढूळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील जलवितरण वाहिन्यांची तांत्रिकदृष्ट्या योग्य पध्दतीने दुरुस्ती केली जात नाही, तात्पुरत्या स्वरुपात उपाययोजना राबविल्या जात आहे, जलशुध्दीकरण प्रक्रियेसाठी लागणारे साहित्य दर्जा योग्य नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याचे टीडीएस नियंत्रणात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील जलवितरण वाहिन्यांची दुरुस्ती कायमस्वरुपी होणे व नागरिकांना दररोज शुध्द पिण्याचे पाणी मिळणेकरिता शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जळगाव महानगरपालिका हद्दीतील जलवितरण वाहिन्यांची लांबी ४४५.६५ कि.मी. असल्याने जलवाहिनीस विविध ठिकाणी गळती होते.

तथापि, महानगरपालिकेने गळती दुरुस्ती करण्यासाठी वार्षिक मक्ता दिलेला असून मक्तेदाराकडून गळती दुरुस्त केली जाते. सदर दुरुस्तीनंतर पाईप लाईन वॉशआऊट केल्यानंतरच पाणी पुरवठा सुरु करण्यात येतो. त्यामुळे नागरिकांना गढूळ पाण्याचा पुरवठा होत नाही.

(२) हे खरे नाही.

पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणारे रसायने यांचा दर्जा वेळोवेळी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, जळगाव यांचेकडून तपासणी करुनच त्याचा वापर करण्यात येतो. सद्यस्थितीत वितरीत करण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा टीडीएस (२२० mg/ltr.) नियंत्रण आहे.

(३) शहरातील वितरण वाहिन्या फारच जुन्या असल्याने, नवीन वितरण वाहिन्या टाकण्यासाठी अमृत योजनेअंतर्गत कामास तांत्रिक मान्यता मिळालेली असून, त्यानुसार योजना राबविण्याचे माहानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.